# मराठी अभ्यासक्रम
# एस.वाय.बी.ए. विशेषस्तर – 1

प्रा. डॉ. द.के. गंधारे
मराठी विभाग प्रमुख
ॲड. एम.एन. देशमुख महाविद्यालय, राजूर ता अकोले जि. अहमदनगर

# पहिले सत्र

## आधुनिक मराठी साहित्य–प्रकाशवाटा

## घटक: 1

| घटक | तपशील | श्रेयांक | तासिका |
|---|---|---|---|
| 1. | आत्मचरित्र :<br>संकल्पना, स्वरूप , प्रेरणा आणि वाटचाल<br>ललित गद्यातील अन्य साहित्यप्रकाराच्या तुलनेत आत्मचरित्राचे वेगळेपण | 1 | 15 |

# आत्मचरित्र संकल्पना

- **आत्मचरित्र संकल्पना:** आत्मचरित्र ही संकल्पना ही संकलपना आत्मशोध या नावाने प्राचीन युगापासून आहे. आत्मशोध म्हणजे स्वतःचा शोध  स्व चा शोध असा अर्थ घेता येतो.
- आनंद यादव लिहितात, ‘‘मी माणूस या नात्याने माझ्या जीवनात जी काही आजवर वाटवाल केली. त्या वाटचालीतील माझी स्थितिगती म्हणजे सुख–दु:खे, आशा–आकांक्षा, विकास–विस्तार,भावसत्ये,कृति7कर्मे आणि या सर्वांतील यशापयश, धडपड यांचा मी केंद्रस्थानी धरून
- काढलेला आलेख किंवा नकाशा’’
- गतजीवनाचा आलेख तटस्थपणे काढणे म्हणजे आत्मचरित्र होय.
- स्वतःच्या जीवनाची स्वतःच लिहिलेली कहाणी म्हणजे आत्मचरित्र होय.
- आपल्या जीवनविषयक अनुभवांचे, तदनुषंगाने आपल्या व्यक्तिमत्त्वाचे, स्वतः लेखकाने लेखनरूपाने घडविलेले दर्शन म्हणजे आत्मचरित्र होय. उत्तम मार्ग म्हणजे आत्मचरित्र लिहिणे होय.

# आत्मचरित्राचे स्वरूप

- आत्मचरित्राचे स्वरूप :
- आत्मचरित्र नायकाच्या जन्मापासून सुरू होऊन त्यात आयुष्याचा बहुतांश भाग त्यात प्रकट झालेला असतो.
- जन्मकाळ, जीवनकाळ यात मांडलेले असते. कार्य आत्मचरित्रात मांडलेले असते.
- ठतिहास हे एखाद्या समाजाचे चरित्र असेल तर आत्मचरित्र हे एका समाजाचा इतिहास असतो.
- आयुष्याच्या अखेरच्या स्मृतिरूपी चांदण्यात गतजीवनाचा जो काय सूिल देखावा दिसेल तो पाहून समाधान पावण्याचा सर्वात सोपा व उ

# आत्मचरित्रलेखनाचे हेतू

- आत्मचरित्रलेखनाचे हेतू

1. आत्मचरित्रलेखनात आत्मचरित्रकार अंतर्मुख होऊन गतकाळाचे पुनरावलोकन, सिंहावलोकन, आत्मपरीक्षण करत असतो.
2. आपल्या विषयीची चुकीची माहिती इतरांनी आपल्या मागे देऊ नये किंवा आपल्या हयातीत जी चुकीची माहिती, बातम्या इतरांनी पसरविल्या त्या कशा चुकीच्या आहेत हे सांगणे.
3. आपल्या कार्याचा वा मताचा प्रचार करणे.
4. आत्मसमर्थन करणे.
5. आपल्या जीवनानुभवातून इतरांना अपेक्षित मार्गदर्शन करणे.
6. केवळ जुन्या आठवणींची उजळणी करणे.

आत्मचरित्र हा व्यक्तिप्रधान वाङ्मयप्रकार असला तरी व्यक्तिकेंद्री होऊन चालत नाही.भुतकाळाचे एक सुसंगत चित्र स्पष्ट होणे गरजेचे असते.

# आत्मचरित्राच्या प्रेरणा

- आत्मचरित्राच्या प्रेरणा :
- आत्मचरित्रात स्वजीवनविषयक अनुभवांचे व स्वत:च्या व्यक्तिमत्त्वाचे दर्शन घडविणे महत्त्वाचे आहे.
- प्रेरणा
- 1. स्वजीवनाचा आढावा घेणे.
- 2. स्वत:च्या कर्तृतवाचा गौरव करणे
- 3. आपल्या हातून घडलेल्या चुकांचे समर्थन करणे.
- 4. अन्यायाची कैफियत मांडणे.

# आत्मचरित्रातील दोष

- आत्मचरित्रात पुढील दोष संभवतात
- आत्मप्रौढी
- आत्मगौरव
- आत्मसमर्थन

# आत्मचरित्रलेखकाने पाळावयाची पथ्ये

- स्वचरित्राचे दर्शन घडवितांना त्यांचे प्रदर्शन करण्याचा मोह त्याला टाळता यावा.
- तटस्थपणा असावा.
- चुकांची कबुली देणे
- सत्य मांडावे
- सत्यकथन करावे.